REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 3.8014(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 4 | JANUARY – 2017

# ''ग्रामसभा : भारतीय लोकशाहीचा पाया ''



**प्रा. वसंत गुरूशांत कोरे**
सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग संगमेश्वर कॉलेज,
सोलापूर.

## प्रस्तावना : —

आधुनिक राज्ये ही प्रंचड प्रादेशिक विस्तार आणि लोकसंख्या असलेली आहेत. अशा विस्तृत राज्यांचे प्रशासन केवळ एका मध्यवर्ती शासनाने करणे अशक्यच नाही तर एकप्रकारे शासनाच्या अकार्यक्षमतेला निमंत्रण देण्यासारखे आहे. त्यामुळे प्रशासकीय कार्याची विभागणी पर्यायाने केंद्रशासन, राज्यशासन आणि स्थानिक शासन यात करणे अपरिहार्य ठरते. त्यामुळे स्थानिक शासन हा ओघानेच शासनाचा अविभाज्य भाग ठरतो. स्थानिक शासनाशिवाय आज कोणत्याही स्वरूपाची शासकीय संरचना परिपूर्ण होऊ शकत नाही.

आजचे युग हे लोकशाही स्वरूपाच्या शासनाचे आहे. लोकशाही रूजण्यासाठी व दृढमूल होण्यासाठी स्थानिक शासनाचे अस्तित्व राजकीय व्यवस्थेत असणे गरजेचे असते. लोकशाही आणि स्थानिक शासन यांचा संबंध अतूट आहे. त्यामूळे स्थानिक संस्था हयाच लोकशाहीच्या खऱ्या आधारस्तंभ आहे असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. या स्थानिक शासनाला किंवा संस्थांना भारतामध्ये पंचायत राज असे म्हटले जाते व तो आज एक महत्वाचा सामाजिक आर्थिक व राजकीय प्रबोधनाचा विषय बनलेला आहे. आजच्या जागतिकीकरणाच्या विस्तारीकरणात 'पंचायत राज' या आदर्श व्यवस्थेचे नेमके स्थान आणि तिच्या सामर्थ्यांची बलस्थाने स्पष्टपणे आपण समजून घेतली पाहिजेत. जागतिकरणाच्या वावटळीत गाव—खेडयांचा टिकाव कुठं लागणार? असा प्रश्न तयार होतो, पण गाव असेल तर राज्य असते, राष्ट्र असते आणि जगही राहते हे इथे लक्षात ठेवणे गरजेचे आहे.

'पंचायत राज' व्यवस्था आपणांस नवी नाही प्राचीन काळापासून भारतात पंचायत व्यवस्थेला मोठे महत्व आहे. पाच व्यक्तीचे मंडळ गावगाडयाचा कारभार पाहत असे. 'पाचमुमी परमेश्वर' ही म्हणही त्यातूनच पुढे आली आहे. वैदिक काळातही ग्रामपंचायती होत्या. त्याचा उल्लेख संस्कृत व पाली वाङःमयात आला आहे. न्यायदानापासून ते करवसुलीपर्यंत सर्व कामे उत्तमपणे या पंचायती करीत होत्या. मध्ययुगात मात्र ही व्यवस्था मोडकळीस आली. परंतु व्हाईसरॉय लॉर्ड मेयो व लॉर्ड रिपन यांच्या ब्रिटिशकालीन प्रशासनात ती पुन्हा गतिमान झाली. लॉर्ड रिपन यांनी इ.स. 1882 साली ग्रामीण स्वशासन संस्थांना पुनरूज्जीवित करून सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा प्रयोग भारतात केला.

## स्वातंत्र्योत्तरकालीन पंचायत राज व्यवस्था :—

स्वांतत्र्यांत्तर काळात भारतातील सामाजिक व राजकीय धुरिणांना ग्रामरचनेचे व ग्रामपंचायतीचे महत्व कळाले आहे. म. गांधीचे असे स्वप्न होते की, भारतातील प्रत्येक खेडे हे स्वयंपूर्ण असावे. त्यांचे हे स्वप्न त्रिस्तरीय

पंचायतीराज्य व्यवस्था (1957 बलवंराय मेहता समिती ) स्वीकारून साकार करण्यात आले. राष्ट्रीय पातळीवर देशाचा कारभार पाहण्यास संसदेची निर्मिती करण्यात आली, तर राज्यपातळीवर विधिमंडळ आणि ग्रामीण पातळीवर जिल्हा हा घटक महत्वाचा मानून लिल्हयाच्या विकास कामात लोकसहभाग वाढावा यासाठी ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि लिल्हा परिषद या त्रिस्तरीय संरचनेची निर्मिती करण्यात आली. अशाप्रकारे भारतामध्ये लोकशाही विकेंद्रीकरणास मोठया प्रमाणात चालना मिळाली. त्यामुळे स्थनिक स्वराज्य संस्थांना अधिक महत्व प्राप्त झाले त्याचबरोबर भारतात वेळोवेळी स्थानिक स्वराज्य संस्थांचे मूल्यमापन करण्यासाठी विविध समित्या स्थापन केल्या गेल्या. त्याच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मूलगामी परिवर्तन घडून आले.

### ग्रामपंचायत :–

पंचायत राज व्यवस्थेतील सर्वात कनिष्ठ स्तर म्हणजे ग्रामपंचायत होय. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय राज्यघटनेच्या कलम 40 मधील राज्याच्या धोरण्याच्या मार्गदर्शक तत्वात गावासाठी ग्रामपंचायती स्थापन कराव्यात असे नमूद करण्यात आले. परंतु मार्गदर्शक तत्वात गावासाठी ग्रामपंचायती स्थाप कराव्यात असे नमूद करण्यात आले. परंतू मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी सरकारने केलीच पाहिजे असे बंधन नसल्यामुळे इतर अनेक प्रश्नांत गुंतलेल्या सरकारला अग्रक्रमाने या बाबीकडे लक्ष पुरविता आले नाही. परिणामी लोकशाहीच्यादृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण असलेल्या सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे स्वप्न साकार झाले नाही. पर्यायाने खेडी अविकसित राहिली. परंतु जोपर्यंत खेडयांचा विकास होणार नाही किंवा ग्रामपंचायतीना जादा अधिकार देण्यात येणार नाहीत. तोपर्यंत खऱ्याअर्थाने भारत कल्याणकारी देश बनू शकणार नाही, याची जाणीव राज्यकर्त्यांना झाली म्हणूनच त्यांनी सन 1992 साली 73वी घटना दुरूस्ती मंजुर करून ग्रामपंचायतीस घटनात्मक दर्जा बहाल केला व त्याचबरोबर ग्रामसभेसही अनेक महत्वपूर्ण अधिकार बहाल केले. त्यामुळे अलिकडे ग्रामसभेचे महत्व वाढलले आपणांस दिसून येते.

### ग्रामसभा :–

पंचायती राज्य व्यवस्थेचा ग्रामसभा हा आत्मा आहे. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद या लोकशाही संस्था आहेत. परंतु त्यांचा कारभार लोकांनी निवडून दिलेले त्यांचे प्रतिनिधी चालवितात. ग्रामसभा ही परिपूर्ण लोकशाही संस्था आहे. कारण भारतातील वेगवेगळया खेडेगांवात राहणारा प्रत्येक प्रौए व्यक्ती या ग्रामसभेचा सदस्य असतो. त्याचबरोबर भारतातल्या प्रत्येक राज्यातील ग्रामसभेची रचना मात्र भिन्न–भिन्न असलेली आपणांस पाहावयास मिळते. वर्षातून किमान दोनवेळा ग्रामसभा घेण्याचे बंधन ग्रामपंचायतीवर आहे. या दोन बंधनकारक सभाशिवाय 15 ऑगस्ट व 26 जानेवारी या दोन दिवशीही ग्रामसभा घ्याव्यात. त्याशिवाय आवष्यकतेनुसार अथवा शासनाच्या आदेशानुसार कितीही जादा सभा होऊ शकतात. गावाचा खरा विकास बाहेरून लादून नव्हे तर गावात गावातील लोकांकडून होणे गरजेचे आहे. विकास कार्याच्या अधिकारांचे हस्तांतरण ग्रामपातळीवर केले तर ग्रामीण क्षेत्राचा कायापालटल होईल. त्यामुळे या गावातील लोक आत्मनिर्भर होतील. त्यांचा आत्मविश्वास वाढीस लागेल आणि त्यांना आपल्या जबाबदारीची जाणीत होईल. यासाठी ग्रामसभा आवश्यक आहे.

### ग्रामसभेची कार्ये :–

ग्रामसभा लोकशाहीचा मुलभूत पाया आहे. गावातील महिला व पुरूष यांनी एकत्र येऊन ग्रामसभेत विकास कामाबद्दल चर्चा करून निर्णय घ्यावयाचा असतो. ग्रामसभेत गावातील पाणी, शेती, रस्ते वीज अशा अनेक विषयांवर चर्चा केली जाते. ग्रामसभेत मान्य झालेला प्रस्ताव ग्रामपंचायतीला स्वीकारणे बंधनकारक आहे. ग्रामसभा यशस्वी होण्यासाठी सरकारने गावाचा विकास गावामधून व गावातील लोकांकडून करणे गरजेचे आहे.

पंचायती राज्य व्यवस्थेमुळे ग्रामसभेला अतिशय महत्वपूर्ण असे स्थान प्राप्त झाले आहे. राज्य सरकारांनी अनेक महत्वपूर्ण अशी कार्ये त्यांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी ग्रामसभेकडे सुपूर्द केली आहेत. ग्रामपंचायतीच्या कारभारात पारदर्शकता आणण्याच्याकामी ग्रामसभा ही महत्वाची भूमिका बजावताना आपल्याला दिसून

येते. ग्रामसभा गावांतील विकासकामांची वर्गवारी करून महत्वाच्या आवश्यक कार्याची तत्परतेने अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करते. याशिवाय ग्रामपंचायतीच्या आर्थिक बाबींवर नियंत्रण ठेवणे, महिला, दलित, व आदिवाशी यांना विकासकामांत सहभागी करून घेणे तसेच केंद्र व राज्य सरकारच्या विविध महत्वाकांक्षी योजनासाठी लाभार्थी निवडणे इ. महत्वपूर्ण कार्ये ग्रामसभा करीत असते. म्हणून माझे असे ठाम मत आहे की, ग्रामसभेचे सक्षमीकरण केले नाही तर पंचायत राज्य व्यवस्थेअंतर्गत उभारलेल्या भारतीय लोकशाहीचा इमला नक्कच कोसळल्याशिवाय राहणार नाही. ग्रामसभेला दुर्लक्षित करून चालणार नाही. कारण ग्रामसभा हाच भारतीय लोकशाहीचा पाया आहे, हे ध्यानात ठेवले पाहिजे.

## महिला ग्रामसभा :–

महाराष्ट्र ग्रामपंचायत कायद्यान्वये (2002) केलेली महिलांच्या स्वंत्त्र ग्रामसभेची तरतूद कल्पक व अनुकरणीय आहे. ग्रामसभेच्या ठरलेल्या दिवसापूर्वी गावातील महिलांची स्वंतत्र ग्रामसभा घेणे बंधनकारक केले आहे. महिला ग्रामसभेतील प्रस्ताव, सुचना इ. मुख्य ग्रामसभेत विचारात घ्यावे लागतात. गावाच्या अनेक गरजा स्त्रियांच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत असतात. त्या ग्रामसभेपुढे येण्याचा मार्ग सुलभ झाला आहे. याचे अनुकरण संबंध भारतभर होणे गरजेचे आहे.

## मूल्यमापन :–

भारतातील जवळपास सर्वच राज्यांनी पंचायत राज्य व्यवस्थेत ग्रामसभेची तरतूद केलेली आहे. या राज्यातील ग्रामसभेचे अवलोकन केल्यास असे लक्षात येते की, ग्रामसभा एक प्रभावहीन संस्था असून ती ग्रामीण जनतेवर प्रभाव टाकण्यास असमर्थ ठरली आहे. 1982 साली भारत सरकारने स्थापन केलेल्या 'पंचायत राज व्यवस्थेतील ग्रामसभेची भूमिका' या विषयावरील अभ्सास समितीनेसुध्दा असाच निष्कर्ष काढला होता. ग्रामसभेस सक्रिय बनविण्यास, राज्यसरकार, जिल्हापरिषद आणि पंचायत समित्या यांनी विविध प्रयत्न केले, परंतु त्यात त्यांना फारशे यश प्राप्त झाले नाही. कारण ग्रामसभेच्या बैठका नियमितपणे बोलविल्या जात नाहीत आणि काही अपवाद वगळता बैठकीस उपस्थितीही समाधानकारक दिसून येत नाही. ग्रामसभांनी लोकांत आवश्यक उत्साह आणि आवड निर्माण केली नाही. ग्रामसभेच्या बैठका लोकांत आवश्यक उत्साह आणि आवड निर्माण केली नाही. ग्रामसभेच्या बैठका लोकांच्या प्रयत्नातून होत नाहीत तर ग्रामसभेत लोकांची उपस्थिती फारशी दिसून येत नाही. महिलांचे प्रमाण तर नगण्यच असते. अशाप्रकारची अनेक कारणे याच्या पाठीमागे आहेत. त्यांचा अभ्सास करून ग्रामीण विकासात गती देण्यासाठी ग्रामसभेस प्रभावी बनविणे अत्यंत आवश्यक आहे.

## ग्रामसभेस प्रभावी बनविण्याचे उपाय :–

ग्रामसभेस प्रभावी बनविण्यासाठी पुढील प्रमाणे उपाययोजना सुचविता येईल. ( ल.ना. बोंगिरवार समिती )

1. ग्रामसभेची बैठक वर्षातून किमान दोन वेळा बोलविण्यात आली पाहिजे. ही जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची जबाबदारी समजण्यात यावी.
2. जो सरपंच ग्रामसभेची बैठक बोलावणार नाही किंवा सतत तीन ग्रामसभेस अनुपस्थित राहिल्यास त्याला पदावरून दूर करण्यात यावे.
3. ग्रामसभेची बैठक दसरा, पोळा, कोजागिरी पौर्णिमा अशा सणांच्या दिवशी बोलावण्यात यावी.
4. बैठकीच्यावेळी सिनेमा, खेळ इ. मनोरंजनाचे कार्यक्रंम आखण्यात यावेत.
5. ग्रामसभेस उपस्थित राहणाऱ्या व्यक्तींना भाषण करण्यास सांगण्यापेक्षा त्यांना ग्रामपंचायतीच्या कामकाजाबाबत प्रश्न विचारण्यास प्रोत्साहन द्यावे. त्या प्रश्नांची उत्तरे सरपंच अथवा ग्रामपंचायत सदस्यांनी द्यावीत.
6. तलाठी, ग्रामपंचायतीचा सचिव व सहकारी सोसायटीचा सचिन यांना ग्रामसभेस उपस्थित राहणे बंधनकारक असावे.

7. प्रत्येक ग्रामसभेस गट–विकास अधिकारी यांचा प्रतिनिधी हजर असला पाहिजे व त्याने लोकांच्या मागण्या, तक्रारी यांची नोंद घेऊन त्या संबंधितास कळविल्या पाहिजेत व ग्रामपंचायतीकडे पूर्तता अहवाल पाठविला पाहिजे.

अशाप्रकारे उपरोक्त उपाय योजनांची काटेकोर अंमलबजावणी केल्यास ग्रामसभा नक्कीच कार्यक्षम व प्रभावी बनण्यास मदत होईल यात तीळमात्र शंका नाही.

## संदर्भ सूची :–

1. Dr. D.D.Dasu['Introduction to the constitution of India', Lexis Nexis Butterworths Wadhwa Publication, Nagapur, 2009.
2. डॉ. भोळे, भा.ल., 'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण', पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर 2003.
3. कुलकर्णी, अ.ना.,'भारतातील स्थानिक स्वशासन', विद्या प्रकाशन, नागपूर 2000.
4. प्राचार्य पाटील, पी.बी. ( सं), 'पंचायत राज्य, जिल्हा नियोजन आणि ग्रामीण विकास परिसंवाद', यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान प्रकाशन, मुंबई – 1988.
5. डॉ. नांदेडकर, व्ही.जी., 'लोकप्रशासन', के.सागर प्रकाशन, पुणे 2003.
6. सिरसीकर, व.मं., 'आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण' ( 1960– 2000 ) कॉन्टिनेंटल प्रकाष्न, पुणे, 2001.
7. यमलवाड, गोविंद, 'स्थानिक स्वराज्य संस्था', कल्पना प्रकाशन, नांदेड 2001.